प्रेस नोट दि. ०८/०६/२०१९

## ॲमेझॉन कंपनीस १७ लाखाचा गंडा घालणाऱ्या दोन आरोपींस सायबर पोलीस स्टेशन कडून केले जेरबंद

ॲमेझॉन या शॉपिंग कंपनीद्वारे विविध वस्तूंची विक्री केली जाते. त्याकरिता ग्राहकांना ॲमेझॉन कंपनीने घेतलेल्या वस्तूच्या रक्कम देणेकरिता कॅश ऑन डिलिव्हरी, सुलभ परतावा इत्यादी सुविधा www.amazon.in या वेबसाईटवर उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. ॲमेझॉन कंपनीस वारंवार काही आयडीवरून बुकींग झाल्याचे निदर्शनास येत होते. सदर आयडीवरून झालेले बुकींग करिता कॅश ऑन डिलिव्हरी हे ऑपशन निवडले जात होते. ग्राहकास सदरची वस्तू रिटर्न करण्याचा अधिकार असल्याने सदरची वस्तू त्यास डिलिव्हर न होता कंपनीस रिटर्न जात होती परंतु ती कंपनीस मिळत नव्हती. ग्राहकाने रिटर्न हा पर्याय निवडल्याने कंपनी सदर ग्राहकास नवीन वस्तु पाठवित होती त्याकरिता कोणतेही पैसे घेतले जात नव्हते. ग्राहकाने सदरची वस्तू रिटर्न केलेली आहे याबाबतची नोंद ॲमेझॉनच्या सिस्टिममध्ये अपडेट होत नव्हती याचा फायदा सदर कंपनीमध्ये काम करणाऱ्या नोकरदारास माहित असल्याने त्याने त्याचा फायदा घेऊन ॲमेझॉन कंपनीची एकूण ११.८९ लाख रूपयांची फसवणुक केली असल्याने अलंकार पोलीस स्टेशन गु.रजि.नं. १३५/१९ भा.द.वि. ४१९,४२०,३४ सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००८ चे कलम ६६सी, ६६डी अन्वये गुन्हा दाखल आहे.

सदर गुन्ह्याचा समांतर तपास करित असताना ॲमेझॉन या कंपनीचे वेबसाईटवरून वारंवार एकाच आयडीवरून सदरचा प्रकार होत असल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने त्याबाबतची माहिती कंपनीकडून प्राप्त करून घेऊन त्याद्वारे विविध पध्दतीने तांत्रिक विश्लेषण केले असता सदर गुन्ह्यातील आरोपी हे सावंतवाडी येथील असल्याचे निष्पन्न झाल्याने सायबर पोलीस स्टेशन कडील १ पथक सदर आरोपीचा शोध घेणेकामी रवाना केले असता सदर पथकाकडून आरोपी नामे अचल अमोल माणगांवकर वय-२६ वर्षे रा. हाऊस नं. १६३७, आनंद पार्क, लेन नं. १डी, धानोरी, पुणे मूळ रा. कलमबीस्त, सावंतवाडी यास ताब्यात घेऊन त्यास सायबर पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे हजर केले असता त्याचा आणखीन एक साथीदार असल्याचे निष्पन्न झाल्याने तो धानोरी य़ेथे रहात असल्याने त्याचा देखील स्टाफ करवी शोध घेण्यात आला असता राशिद जुम्मन चौधरी रा. प्रतासत्ता कॉलनी, लनं. १, मुंजोबा वस्ती, धानोरी, पुणे हा मिळून आला. त्यांचा सदर गुन्ह्यात सक्रिय सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना सदर गुन्ह्यात १६.३० वाजता अटक करण्यात आली आहे. त्यांच्याकडून एकूण २४ लाख रूपयांच्या वेगवेगळ्या इलेक्ट्रॉनिक वस्तु हस्तगत करण्यात आलेल्या आहेत.

सदरची कामगिरी ही अशोक मोराळे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, संभाजी कदम, पोलीस उप आयुक्त, आर्थिक व सायबर गुन्हे, मितेश गट्टे, पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, निलेश मोरे, सहा. पोलीस आयुक्त, आर्थिक व सायबर गुन्हे पुणे शहर यांचे सूचनेनुसार राधिका फडके, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सहा. पोलीस निरीक्षक सादर पानमंद, पो.शि. गावडे, पो.शि. हंडाळ, पो.शि. वाव्हळ, पो.शि.पोतदार, म.पो.हवा.वेताळ, पो.ना. जाबा, पो.शि. निकम, पो.शि. जाधव, पो.शि. पुंडलिक, पो.शि. भोरडे, पो.शि. शेख, यांचे पथकाने कारवाई केलेली आहे.

(मितेश गट्टे)
पोलीस उप आयुक्त,
आर्थिक व सायबर गुन्हे
पुणे शहर.


Norton

